**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**

दूरध्वनी क्रमांक ०२३४४/२४६१३४ Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपिल/१५७/२०२३,

दिनांक - ३१.०१.२०२५

## शुध्दीपत्रक

क्र.आरटीएस/अपील/१५७/२०२३, दिनांक ३१.१२.२०२४ या निकालपत्रामध्ये प्रकरणी आदेश पारीत करतेवेळी टंकलेखनात चुक झालेली असून, त्यामध्ये या उपरोक्त आदेशाने पुढीलप्रमाणे **शुध्दीपत्रक** करणेत येत आहे.

| अ.क्र. | या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|
| १ ( अ | १. सोनाली निलेश नागपूरे<br>२. सार्थक निलेश नागपुरे<br>अपाक आई अपिलार्थी क्र.१<br>दोघे रा.लमाणतांडा, उटगी पो.उटगी ता.जत जि.सांगली .... **अपिलार्थी** | ३. सोनाली निलेश नागपूरे<br>४. सार्थक निलेश नागपुरे<br>अपाक आई अपिलार्थी क्र.१<br>दोघे रा. प्लॉट नं.१, गोकर्ण कॉलनी, संगमनगर, ता.जि.सातारा .... **अपिलार्थी** |

ज

(अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -३१.०१.२०२५

**प्रति,**

१. सोनाली निलेश नागपूरे
२. सार्थक निलेश नागपुरे
अपाक आई अपिलार्थी क्र.१
दोघे रा. प्लॉट नं.१, गोकर्ण कॉलनी, संगमनगर, ता.जि.सातारा .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. तहसिलदार जत ता.जत जि.सांगली
२. मंडळ अधिकारी शेगांव ता.जत जि.सांगली
३. तलाठी शेगांव ता.जत जि.सांगली ---- **जाबदार**

**प्रत- तलाठी येळवी**

२- सदर शुध्दीपत्राची प्रत सर्व संबंधितास बजावनू दिनांकीत पोहोच इकडे सादर करावी.

**प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी**

**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात...**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र. आरटीएस/अपील/१५७/२०२३

दिनांक-३१.१२.२०२४

**प्रति,**

१. सोनाली निलेश नागपूरे

२. सार्थक निलेश नागपुरे अपाक आई अपिलार्थी क्र.१

दोघे रा.लमाणतांडा, उटगी पो.उटगी ता.जत जि.सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. तहसिलदार जत ता.जत जि.सांगली

२. मंडळ अधिकारी शेगांव ता.जत जि.सांगली

३. तलाठी शेगांव ता.जत जि.सांगली ---- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| येळवी | जत | १९७ | २१ हे. १३ आर. | ०१ हे ६० आर | ३०६१, २४८२ |

मौजे येळवी येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी शेगांव यांनी फेरफार क्रमांक ३०६१,२४८२ प्रकरणी दिले निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली आहे.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. मौजे येळवी, ता.जत येथील शेतजमीन गट नं.१९७ क्षेत्र २१ हे. ४८ आर पो.ख.०-२९ आर. आकार १० रु.८७ पैसे या क्षेत्रास अपिलार्थी यांची एकूण क्षेत्रापैकी १ हे. ६० आर क्षेत्रास नोंद होती सदरची नोंद अपिलार्थी यांनी सन २०१७ साली सदरचे ७/१२ चे उतारे काढले असता अपिलार्थी यांच्या नावासमोर ०-८० आर क्षेत्राची नोंद झालेली होती ही बाब त्यांना दिसून आल्यामूळे त्यांनी तहसिलदार जत यांचेकडे अर्ज करुन त्यांची पूर्ववत नोंद करण्याबाबत अर्ज दिलेला होता. त्यावेळी कागदपत्रे व मंडळ अधिकारी शेगांव यांच्या अहवालाचे अवलोकन करून तहसिलदार जत यांनी अपिलार्थी नं.१ व २ यांचे खाते क्र.१००१ प्रमाणे १ हे. ६० आर अशी नोंद करण्याबाबत ता.११/९/२०१७ रोजी हुकूम केलेला होता. सदरचा हुकूम अस्तित्वात असताना महसुल रेकॉर्डला अपिलार्थी यांचे नावासमोर खाडाखोड करून ०-८० आर क्षेत्राची नोंद करण्यात आली. सदरची नोंद करण्याबाबत तहसिलदार जत अथवा वरीष्ठ अधिकाऱ्यांनी त्यावेळी कोणताही हुकुम केलेला नव्हता. त्यामुळे ता.११/९/२०१७ रोजीचा तहसिलदार जत यांचा हुकुम अस्तित्वात असताना व तो हुकुम कोणत्याही वरीष्ठ अधिकारी यांनी रद्द केलेला नसताना तात्कालीन मंडल अधिकारी यांना चुकीचे फेरफार धरुन अपिलार्थी यांचे नावचे क्षेत्र कमी करण्याबाबत धरलेला फेरफार रद्द होणे आवश्यक असल्याने सदरचा फेरफार रद्द करण्यात येवून अपिलार्थी यांची पूर्ववत १ हे.६० आर क्षेत्रास नोंद करण्यात यावी.

२. तहसिलदार जत यांनी हनो/वशी/१३/१७ चे हुकुमाने ता.११/९/२०१७ रोजी अपिलार्थी यांचे नावे १ हे. ६० आर क्षेत्र नोंदणेबाबत हुकुम केलेला होता. सदरच्या हुकुमाची अंमलबजावणी न करता मंडल अधिकारी शेगांव यांनी फेरफार नं.२४८२ हा अपिलार्थी यांच्या परस्पर तहसिलदार जत यांचा आदेश क्र.हनो/वशी/१६/१८ चा आधार घेवून अपिलार्थी यांचे नावे १ हे. १८ आर क्षेत्र नोंदण्यात आले. त्याप्रमाणे फेरफार नं.२४८२ हा धरण्यात आलेला असून तो ता.३/९/२०१८ रोजी मंजूर झालेला आहे. सदरचा फेरफार मंजूर होताना अपिलार्थी यांना मंडल अधिकारी यांनी कोणतीही नोटीस काढलेली नव्हती. सदरची नोंद अपिलार्थी यांच्या परस्पर

करण्यात आलेली आहे व त्यानंतर पुन्हा मंडल अधिकारी शेगांव यांनी अपिलार्थी यांच्या क्षेत्राबाबत फेरफार नं.३०६१ हा धरण्यात येवून त्यामध्ये शासन निर्णयाच्या निर्णयाप्रमाणे ई-फेरफार अंमलबजावणीचे कारण देवून तो फेरफार ता.९/४/२०२१ रोजी अपिलार्थी यांना नोटीस न देता त्यांचे परस्पर मंजूर करण्यात आलेला आहे व त्याने पुन्हा अर्जदारांचे क्षेत्र कमी करण्यात आलेले आहे व त्यानंतर आजमितीस सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर अर्जदार यांचे नावापुढे ०-८१ आर क्षेत्राची नोंद असून त्याचा फेरफार नं. नावासमोर १ असा दाखवत आहे. अशा परिस्थितीत सदरचे दोन्हीही फेरफार रद्द होवून अपिलार्थी यांची पुर्ववत १ हे.६० आर क्षेत्रास नोंद होणे आवश्यक आहे. परंतू २४८२ हा फेरफार हा सन २०१८ सालातील फेरफार असून ३०६१ हा सन २०२१ सालातील फेरफार आहे. त्यामुळे फेरफार नं. ३०६१ हा अपिलार्थी यांनी नुकतेच त्यांना सदरची बाब समजल्यावर आव्हानित केलेला आहे त्यामूळे फेरफार नं. २४८२ हा वेगळा आव्हानित करण्याची आवश्यकता नाही. परंतु सदरकामी फेरफार नं.३०६१ हा नामंजूर झालेचे दिसून येत आहे. त्यामुळे याकामी तहसिलदार. यांनी ११/०९/२०१७ रोजी केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

३. तहसिलदार जत यांनी ता.११/९/२०१७ रोजी क्र. हनो/१३/२०१७ चे हुकुमाने अपिलार्थी यांच्या नावे गट नं.१९७ मधिल क्षेत्र नोंदण्याबाबत चौकशी करून सदरचे क्षेत्र अपेलंट यांच्या नावे नोंद करणेबाबत हुकुम केलेला होता. परंतू सदरच्या हुकुमाची कधिही गट नं.१९७ मधिल अर्जदारांचे क्षेत्राबाबत अंमलबजावणी झाली नाही. तसेच सदरचा ता. ११/९/२०१७ रोजीचा तहसिलदार. जत यांचा हुकुम कोणत्याही वरीष्ठ अधिकाऱ्यांनी रद्द केलेला नव्हता त्यामूळे ता.११/९/२०१७ रोजीचा तहसिलदार. जत यांचा हुकुम कायम असताना त्याबाबत पुन्हा जाबदार यांनी शासन निर्णयाचा आधार घेवून अपेलंट यांच्या नावाचे क्षेत्र कमी करण्याकरिता धरण्यात आलेले फेरफार हे मूलतः बेकायदेशीर असलेने ते रद्द करण्यात यावेत.

४. जाबदार यांनी धरण्यात आलेले फेरफार नं.२४८२ व ३०६१ हे फेरफार मंजूर करतेवेळी अर्जदार यांना कोणतीही नोटीस काढलेली नाही. त्यामूळे सदरचे फेरफार हे अपिलार्थी यांच्या परस्पर त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी न देता मंजूर करण्यात आलेले असल्यामुळे ते फेरफार मूलतः बेकायदेशीर आहेत त्यामूळे ते रद्द होण्यास पात्र आहेत. त्यामुळे फेरफार नं.३०६१ रद्द करण्यात यावा. त्याचप्रमाणे फेरफार नं.२४८२ रद्द करण्यात यावा.

५. गट नं.१९७ यामध्ये काही खरेदीपत्रे झालेली आहेत सदरच्या खरेदीपत्रांबाबत अर्जदार यांच्या गट नं.१९७ मधिल अपिलार्थी नं.१ यांचे सासरे सुभाष नागपुरे यांनी खरेदी दिलेल्या ०-६० आर क्षेत्र परमेश्वर जगदाळे व इतर यांना विक्री केलेली होती त्याबाबत मंडल अधिकारी शेगांव यांचेकडे अपिलार्थी नं.१ यांनी तक्रार केल्यामूळे तेथे त.र.नं.३५/२०२१ हे प्रकरण चालले. त्यामध्ये मंडल अधिकारी शेगांव यांनी सदरच्या क्षेत्राबाबत धरलेला फेरफार नं.३१६५ हा नोंद करणेकामी क्षेत्राचा मेळ बसत नसल्याने सदरचा फेरफार रद्द केलेला आहे. अशा परिस्थितीत अपिलार्थी यांची १ हे. ६० आर क्षेत्रास पूर्ववत नोंद होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामूळे जाबदार यांनी कोणत्या आधारे अपेलंट यांचे क्षेत्र कमी करण्याबाबत फेरफार नं. २४४२ व ३०६१ धरण्यात आले हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे फेरफार नं. ३०६१ रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामूळे तो रद्द करणेत यावा. अपिलार्थी यांचे नांवे वाद मिळकतीस १.६० हे.आर क्षेत्र नोंद करणेत यावे.

**जाबदार यांना प्रस्तुत अपिलकामी नोटीस बजाऊन म्हणणे मांडणेची संधी देऊनही प्रकरणी कोणतेही म्हणणे प्रकरणी सामील केलेले नाही.**

**प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, अपिलार्थी यांचा लेखी युक्तिवाद, खालील कोर्टाची कागदपत्रे व प्रकरणी दाखल उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे येळवी येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी शेगांव यांनी फेरफार क्रमांक ३०६१ प्रकरणी दिले निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपील दाखल केलेले आहे. तसेच अपिलार्थी यांनी दिले लेखी युक्तीवादामध्ये फेरफार क्रमांक ३०६१ व २४८२ रद्द करणेत येवून तहसिलदार जत यांनी क्र.हनो/वशी/१३/२०१७, दिनांक ११.०९.२०१७ रोजीचे आदेशाप्रमाणे १.६० हे.आर क्षेत्र अपिलार्थी यांचे नांवे दाखल करणेची विनंती केलेली आहे.

२. वास्तविक अपिलार्थी यांचे पुर्वहक्कदार निलेश सुभाष नागपुरे यांना १ आणे ३ पैचा हिस्सा फेरफार क्र. ५०१, दिनांक १४.०७.१९९३ ने आलेला होता. तदनंतर निलेश सुभाष नागपूरे हे दिनांक २६.०३.२०१२ रोजी मयत झालेनंतर त्यांचे वारसा नोंद फेरफार क्र.२०१३ नुसार झाली आहे. त्यानुसार अपिलार्थी यांचे वारस म्हणून नोंद झालेली आहे.

३. तहसिलदार जत यांनी क्र.हनो/वशी/१३/२०१७, दिनांक ११.०९.२०१७ ने मंडळ अधिकारी शेगांव यांचा सविस्तर चौकशी अहवाल घेवून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार अपिलार्थी यांचे नांवे १.६० हे.आर क्षेत्र नमूद करण्याचा आदेश दिलेला होता. तलाठी येळवी यांनाही सदर आदेशानुसार ७/१२ उतारा व खाते उतारा सादर करणेचा आदेश दिलेला होता. असे असतांना तहसिलदार जत यांनी क्र.हनो/वशी/१६/२०१८, दिनांक १७.०७.२०१८ रोजी त्यांच दुरूस्तीकामी पुनःश्च आदेश पारीत करून अपिलार्थी यांचे नांवे १.१८ हे.आर क्षेत्र दाखल करण्याचा आदेश दिलेला आहे. वास्तविक वाद मिळकतचे दुरूस्तीकामी यापुर्वीच तहसिलदार जत यांनी क्र.हनो/वशी/१३/२०१७ दिनांक ११.०९.२०१७ रोजी आदेश दिलेला असतांना त्याप्रमाणे ७/१२ सदरी अंमल न देता व पुर्वीचा आदेश अबाधित असतांना तो सक्षम न्यायालयातून रद्दबातल करून न घेता त्यांच दुरूस्तीकामी नव्याने तहसिलदार जत यांनी क्र.हनों/वशी/१६/२०१८ दिनांक १७.०७.२०१८ ने दिलेला आदेशच मुळात कायदेशीर ठरत नाही.

४. **तहसिलदार जत यांचा** क्र.हनो/वशी/१३/२०१७, दिनांक ११.०९.२०१७ चा आदेश कायम असतांना क्र.हनों/वशी/१६/२०१८, दिनांक १७.०७.२०१८ ने बेकायदेशीरित्या आदेश पारीत करून सदर आदेशाच्या अंमल देणेसाठी फेरफार क्र.२४८३ व ३०६१ असे दोन फेरफार ते पण एकाच आदेशाचे तलाठी यांनी नोंदविले असून मंडळ अधिकारी यांनी प्रमाणीत केलेले आहेत. उक्त फेरफार क्र.३०६१ मंडळ अधिकारी यांनी रद्द केलेला आहे व फेरफार क्रमांक २४८२ रद्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता तहसिलदार जत यांनी क्र.हनो/वशी/१३/२०१७ दिनांक ११.०९.२०१७ ने दिलेल्या आदेशाप्रमाणे अधिकार अभिलेख सदरी नोंद करणेच न्यायाचे ठरणार आहे. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचा अपील अर्ज मान्य करणेत येत आहे. तहसिलदार यांचेकडील क्र.हनों/वशी/१६/२०१८ दिनांक १७.०७.२०१८ रोजीचा आदेश रद्द करणेत येवून मौजे येळवी ता.जत येथील फेरफार क्रमांक २४८२ हा रद्द करणेत येत आहे. तसेच मंडळ अधिकारी शेगांव व तलाठी येळवी यांनी ७/१२ चे क्षेत्र मेळात/ खात्री करून तहसिलदार जत यांचेकडील आदेश क्र.हनो/वशी/१३/२०१७ दिनांक ११.०९.२०१७ प्रमाणे नोंद करणेत यावी.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधीनंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -३१.१२.२०२४

प्रत- तहसिलदार, जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.तसेच तहसिलदार जत यांचेकडील **क्र.हनो/वशी/१३/२०१७ दिनांक ११.०९.२०१७ ची मुळ संचिका पान १ ते १८५ सोबत पाठविणेत येत आहे.**